# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक ०७ मार्च, २०२५ / फाल्गुन १६, १९४६ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) उप मुख्यमंत्री**<br>**(२) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**<br>**(३) जलसंपदा (विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**<br>**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २५**

---

**राज्यातील होर्डिंगचे सर्वेक्षण करून त्याचे संरचनात्मक लेखा परिक्षण करण्याबाबत**

**(१) * २७२६ डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पुर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर, मुंबई तसेच कल्याण व इतर ठिकाणी मोठे होर्डींग कोसळून अनेक लोकांचा मृत्यू झाल्यामुळे होर्डींग संदर्भात निश्चित धोरण ठरविण्यासाठी गठीत केलेल्या समितीच्या निष्कर्षाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(२) असल्यास, राज्यातील सर्व होर्डींगचे सर्वेक्षण करुन त्याचे संरचनात्मक लेखापरिक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करण्याचे आदेश शासनाने दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक ठिकाणी संरचनात्मक लेखापरिक्षण अद्याप करण्यात आलेले नसून अनेक ठिकाणी सदोषरित्या हे लेखा परिक्षण करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच धाराशीव येथे नगरपालिकेने सर्वेक्षण करुन मोठे होर्डिंग लावणा-या संस्थाना नोटीसा पाठवून देखील अनेकांनी संरचनात्मक लेखा परिक्षण केले नाही तर काही ठिकाणी सदोष लेखापरिक्षण केल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील धोकादायक व अनधिकृत होर्डींग हटविण्याबाबत अनेक नागरीक व स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे महानगरपालिकेकडे तक्रार करुनही यासंदर्भात कोणतीही कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन होर्डींग दुर्घटनेत मृत्यू पडलेल्या व जखमी झालेल्यांना आर्थिक मदत देणे, सर्व होर्डींगचे संरचनात्मक लेखा परिक्षण शासनमान्य संस्थेकडून करणे, होर्डींगसंदर्भात निश्चित धोरण ठरविण्याबाबत तसेच अनधिकृत होर्डींगसंदर्भात दोषी असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) राज्यातील महानगरपालिकेत बृहन्मुंबई महानगरपालिका व नगरपरिषद, नगरपंचायती क्षेत्रांकरीता वेगवेगळया जाहिरात धोरण निर्गमित करण्यात आले आहेत. घाटकोपर दुर्घटनेनंतर सदर नियमावलीचे काटेकोर पालन करण्याबाबत तसेच अनधिकृत होर्डिंग निष्कासनाची कार्यवाही तात्काळ करण्याबाबत सूचना सर्व

महानगरपालिका व नगरपरिषद, नगरपंचायतींना देण्यात आल्या आहेत. तसेच अनधिकृत होर्डिंग, उंच लोखंडी मनोरे, मोबाईल टॉवर, लोखंडी कार पार्किंग मनोरे इत्यादींचे संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासाठी वेगळ्याने समिती गठीत करण्यात आलेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे, खरे नाही.

(४) हे, खरे नाही.

शहरातील सद्यस्थितीत उभे असलेल्या जाहिरात फलकांचे संरचनात्मक परीक्षण झाले असून संरचनात्मक परीक्षणात धोकादायक आढळून आलेल्या ६ होर्डिंग्ज नगरपरिषदेमार्फत निष्कासित करण्यात आल्या आहेत.

(५) महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रातील धोकादायक व अनधिकृत होर्डिंग हटविण्याचे आदेश सर्व महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायतींना देण्यात आले आहेत.

(६) राज्यातील महानगरपालिका क्षेत्राकरीता आकाश चिन्हे आणि जाहिरात प्रदर्शनाचे नियमन व नियंत्रण नियमावली, २०२२ तसेच बृहन्मुंबई, नगरपरिषद, नगरपंचायतींसाठी मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहेत. सदर जाहिरात नियमावलीत जाहिरात नियमावलीत फलक/होर्डिंग उभारणाऱ्या अभिकरणास अकल्पित उद्धवणाऱ्या दुर्घटनांच्या दायित्वांबाबत आवश्यक तो विमा सादर करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. सर्व होर्डिंगचे लेखापरिक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

-----------------

## मुंबई-नाशिक महामार्गावरील ठाणे ते वडपे येथील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२) * २५१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नाशिक महामार्गावर ठाणे ते वडपे दरम्यान सुरु असलेल्या २३ कि.मी. कॉंक्रीटीकरणाचे काम अद्याप अपूर्णावस्थेत असतानाच निकृष्ट दर्जाच्या कामामुळे रस्त्यावर जवळजवळ ५०० ठिकाणी मोठमोठ्या भेगा पडल्या असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच या महामार्गावरील माजिवडा ते वडपे या मार्गाच्या रुंदीकरणाचे ३६ टक्के काम अद्यापही अपूर्ण असून माहे जून, २०२५ अखेर ते पूर्ण करण्याचा दावा महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खारेगाव टोलनाका परिसरातील खारेगाव खाडीपूलाच्या रुंदीकरणाचे काम मात्र अद्यापही पुर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रस्त्यांची अपूर्ण कामे तसेच कामाच्या निकृष्ट दर्जामुळे पडलेल्या भेगा इत्यादीमुळे तेथे अपघातांचे प्रमाण वाढले असून मोठ्या प्रमाणावर वाहतुक कोंडी होत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू कामासाठी मंजूर निधीपेक्षा अतिरिक्त किती निधी भेगा बुजविण्यासाठी खर्च करण्यात आला आहे,

(६) असल्यास, या संपुर्ण प्रकरणांची शासनाने चौकशी करुन रस्त्यांची कामे दर्जेदार करून तातडीने पुर्ण करण्याबाबत तसेच यात झालेल्या गैरव्यवहारास जबाबदार कंत्राटदार व संबंधित दोंषी अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) करारनाम्याच्या तरतूदीप्रमाणे काम प्रगतीत असून रस्त्याच्या पृष्ठभागावर काही भागात भेगा पडल्या आहेत, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) ठराविक वेळेत वाहतुक कोंडी होते, हे खरे आहे.
अपघाताचे प्रमाण वाढल्याची नोंद नाही.
(५) सदरची कामे करारनाम्याच्या तरतूदीप्रमाणे कंत्राटदारामार्फत कार्यान्वीत करण्यात येत आहेत. अतिरीक्त निधी खर्च करण्यात आला नाही.
(६) वडपे ते ठाणे या लांबीतील कामांचे त्रयस्थ पार्टी ऑडीट करण्यासाठी व्ही.जे.टी.आय. या संस्थेची नेमणूक केलेली आहे. अहवालातील निष्कर्षानुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे. सदरची कामे करारनाम्याच्या तरतूदीप्रमाणे व विनिर्दिष्ट मानकाप्रमाणे मे,२०२५ पर्यंत करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट (अंधेरी) येथील ओबेरॉय संकुलातील "स्कायपॅन" इमारतीला लागलेली आग**

**(३) * ७ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई मध्ये इमारतींना आग लागण्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून सन २०२४ मध्ये सुमारे ५ हजार २९६ लहान-मोठ्या आगीच्या घटना घडून त्यात जवळजवळ २१ जणांचा मृत्यू आणि १७६ जण जखमी झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच मुंबई उपनगरातील अंधेरी (पश्चिम) येथील लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट परिसरातील ओबेरॉय संकुलातील "स्कायपॅन" इमारतीला लागलेल्या आगीत एका वृध्दाचा मृत्यू तर अन्य एक जण जखमी झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय, अशासकीय, निमशासकीय व खाजगी इमारतींमध्ये मोठ्या प्रमाणात अग्निशमन नियमावलीचे पालन न होणे, दाटीवाटीने उभारलेल्या इमारती, झोपड्यांचा विळखा व अनधिकृत बांधकामे इत्यादींमुळे आग लागण्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अशा घटनांवर आळा घालण्यासाठी इमारतींचे अग्निशमन लेखापरिक्षण (फायर ऑडीट) त्रयस्थ यंत्रणेकडून करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अग्निसुरक्षा नियमांचे पालन करणे, स्वयंचलित अग्निशमन यंत्रणा बंधनकारक करणे, नियमित तपासणी करुन उल्लंघन केलेल्या इमारतींवर कारवाई करण्याबाबत तसेच यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अशंत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये सन २०२३ मध्ये एकूण ५ हजार ७४ व सन २०२४ मध्ये सुमारे ५ हजार ३०१ लहान-मोठ्या आगीच्या घटना घडल्या असून सन २०२४ मध्ये लागलेल्या आगीच्या घटनांमध्ये २१ जणांचा मृत्यू आणि १७६ जण जखमी झाले आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.

आग लागण्याच्या घटनांसाठी मुख्यत: सदोष विद्युत प्रवाह, ज्वलनशिल पदार्थांचे निष्काळजीपणे हाताळणे अग्निशमन नियमावलीचे पालन न होणे इ. बाबी कारणीभूत आहेत.

(४) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम, २०२३ च्या कलम ४५ (अ) मध्ये लेखापरीक्षण (फायर ऑडिट) करण्याची तरतूद करण्यांत आली असून ज्या इमारती कलम ४५ मध्ये दर्शविण्यांत आलेल्या आहेत, त्यांच्या मालक / भोगवटादारांनी प्रथम वर्षी लेखारीक्षण करणे व त्यांनतर प्रत्येक दोन वर्षातून एकदा लेखापरीक्षण करावयाचे आहे.

लेखापरीक्षकाच्या नेमणुकीबाबत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना नियमात योग्य ती सुधारणा करण्याची कार्यवाही विभाग स्तरावर सुरु आहे.

(५) मुंबई अग्निशमन दलाकडून दर महिन्याला याद्रुच्छिक (RANDOM) पध्दतीने इमारतींमधील अग्नि प्रतिबंधक व अग्निसुरक्षा यंत्रणेची तपासणी केली जाते. इमारतींच्या यंत्रणेमध्ये त्रुटी आढळल्यास संबंधित इमारतीचे मालक / भोगवटादार / आस्थापना / व्यवस्थापन / गृहनिर्माण संस्था यांना महाराष्ट्र अग्नि प्रतिबंधक व जीव सुरक्षा अधिनियम २००६ नुसार कलम ६ व नियम ९(।) अन्वये नोटीस बजावण्यात येते. मर्यादित विहित कालावधीमध्ये पूर्तता न केल्यास संबधितांवर आरोपपत्र (Offence Sheet) दाखल करण्यात येऊन सदर प्रकरण मा.मुख्य महानगर दंडाधिकारी न्यायालयात दाखल करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अभियोग दाखल केला जातो. सन २०१५ ते डिसेंबर, २०२४ या कालावधीत महाराष्ट्र अग्नि प्रतिबंधक व जीव सुरक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार २७०० नोटीशी बजावण्यात आल्या असून ६४ प्रकरणी अभियोग दाखल करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पवना (जि.पुणे) नदीवर बांधण्यात आलेल्या बटरफ्लाय आकाराच्या पुलाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४)** * **३५२७ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने चिंचवडगाव येथील थेरगावकडे जाण्यासाठी पवना नदीवर बटरफ्लाय आकाराचा पूल उभारण्याबाबत २५ कोटी रुपयांची निविदा प्रसिद्ध करून निविदा रकमेच्या १४ टक्के अधिक दराने धनेश्वर कन्स्ट्रक्शन या कंत्राटदाराला कार्यादेश देण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठेकेदाराला निविदेतील अटी व शर्तींना अधीन राहुन सदर पुलाचे काम १८ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असताना सदर काम वेळेत पूर्ण न केल्याने प्रथम दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत व तद्नंतर दिनांक २६ जानेवारी, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन वेळा मुदतवाढ देऊनही सदर पुलाचे काम पूर्ण झाले नसल्याने सदर काम महानगरपालिकेमार्फत अतिरिक्त १५ कोटी रुपये खर्च करुन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणात कंत्राटदार, सल्लागार व संबंधित अधिकारी यांनी संगनमताने केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते यांनी लेखी पत्राद्वारे माहे जानेवारी, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात महानगरपालिका आयुक्तांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

बटरफ्लाय पुलाच्या कामाचे आदेश दि.३०/१०/२०१७ रोजी देण्यात आले होते. तथापि जलसंपदा विभागाकडून पुलाच्या कामासाठी ना हरकत दाखला मिळण्यास झालेला विलंब, त्यानंतर कोविड-१९ मध्ये मनुष्यबळ, साहित्य, मशिनरीची कमतरता, नदी व पुलापर्यंत अवजड मशिनरीच्या दळणवळणास अपुरी जागा इत्यादी कारणांमुळे काम पूर्ण करण्यास मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

जलसंपदा विभागाच्या अभिप्राय नुसार पुलाचे उंचीत झालेल्या वाढीमुळे कामाच्या रकमेत वाढ झाली. त्यामुळे मूळ निविदा रकमेमध्ये पुलाचे बांधकाम व चिंचवड बाजूकडील पोहोच रस्त्याचे बांधकाम करणे शक्य होते व त्याप्रमाणे बांधकाम पूर्ण करणेत आलेले आहे. थेरगाव बाजूकडील पोहोच रस्त्याचे काम बाकी राहिल्याने सदर कामासाठी नवीन स्वतंत्र निविदा काढून सदर काम करण्याचे ठरले. त्यानुसार ११.०३ कोटी रुपये रक्कमेची स्वतंत्र निविदा काढून सदर कामासाठी दि.०८/०८/२०२३ रोजी कामाचा आदेश देण्यात आलेला आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पार-गोदावरी (जि.नाशिक) येथे एकात्मिक नदी जोड योजना राबविण्याबाबत**

**(५) * ५१ श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नार-पार खोऱ्यातील (जि.नाशिक) अतिरिक्त पाणी तुटीच्या गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी पार-गोदावरी ही एकात्मिक नदी जोड योजना राबविण्याबाबत लोकप्रतिनिधींनी जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ) मंत्री यांचेकडे दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास मागणी केलेली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील पायरपाडा आणि गुगुळ प्रवाही वळण योजनांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची लोकप्रतिनिधी यांनी जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ) मंत्री यांचेकडे दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,कायमस्वरूपी अवर्षणप्रवण असलेल्या दिंडोरी, चांदवड, येवला, नांदगाव,वैजापूर व गंगापूर तालुक्यातील सिंचनासाठी प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.

(२) होय,

पायरपाडा आणि गुगुळ प्रवाही वळण (जि.नाशिक) योजनांची सद्यस्थिती पुढील प्रमाणे आहे.

प्रवाही वळण योजना पायरपाडा ता.दिंडोरी जि.नाशिक ही योजना उर्ध्व गोदावरी प्रकल्पांतर्गत चतुर्थ सुप्रमा मध्ये समाविष्ट असुन चतुर्थ सुप्रमा शासन निर्णय क्र.सुप्रमा-०२११/(प्रक्र-३७/२१) मोठे प्रकल्प-१, दि.०३/११/२०२२ अन्वये मान्यता प्राप्त आहे. सदर योजनेची भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून फेब्रुवारी-२०२५ अखेर काम सुरू करण्याचे नियोजन आहे.

गुगुळ प्रवाही वळण योजनेच्या सर्व साधारण आराखड्यास प्राधिकरण कार्यालयाचे दि.१४/०८/२०२४ पत्रान्वये मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुषंगाने योजनेचे सविस्तर अन्वेषण व प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) सद्य:स्थितीत उपलब्ध पाण्याचे परिगणन करतांना पार गोदावरी नदी जोड योजना क्र. ३ व ४ करिता मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, मुंबई यांनी उपलब्ध करून दिलेल्या एकूण ८५.४१ द.ल.घ.मी. पाण्यामधून उर्ध्व बाजूचा एकूण पाणीवापर ४०.१५ द.ल.घ.मी. वजा करून उर्वरीत ४५.११ द.ल.घ.मी. पाणी सद्य:स्थितीत उपलब्ध असल्याचे जलविज्ञान नाशिक यांचे मार्फत दि.२७/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाकरिता ४०.१५ द.ल.घ.मी. ची तूट आहे.

प्रस्तावित पार-तापी-नर्मदा प्रकल्प रद्द झाल्याने महाराष्ट्र राज्यांतर्गत प्रकल्पांसाठी पाणी उपलब्ध होत आहे. प्रस्तावित पार-तापी-नर्मदा प्रकल्प रद्द झाल्याने पार-तापी-नर्मदा योजनेतून उपलब्ध होत असलेल्या पाण्याचा पार-गोदावरी योजना तसेच इतर राज्यांतर्गत तुटीच्या खोऱ्यातील योजनांकरिता वळविण्याबाबत तसेच पार-तापी-नर्मदा योजनेतून उपलब्ध होणारे पाणी पार-गोदावरी योजनेकरिता अधिकाधिक वापर करण्याच्या दृष्टीने तलांकनिहाय मर्यादा न ठेवता सविस्तर

अभ्यास करून अहवाल शासनास सादर करणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जव्हार (जि.पालघर) नगर परिषदेतील विकास कामांना तांत्रिक मान्यता न देता शासकीय निधीचा केलेला अपहार**

**(६) * २६९ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) नगरपरिषदेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी ४३ विकास कामांच्या बनावट तांत्रिक मान्यतेच्या आधारे रूपये १३ कोटीहून अधिक शासकीय निधीचा गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकूण ४३ विकास कामांची कोणतीही तांत्रिक मान्यता न घेता तसेच प्रत्यक्षात तांत्रिक मान्यता शुल्क न भरता बनावट सही शिक्क्यांच्या आधारे तांत्रिक मान्यता दिल्याचे दर्शवून जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रशासकिय मान्यता मिळविण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी तत्कालिन उप विभागीय अधिकारी यांच्या चार सदस्यीय समितीने दिनांक ४ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास सदर गैरव्यवहाराचा विस्तृत चौकशी अहवाल जिल्हाधिकारी, पालघर यांना सादर केला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर चौकशी अहवालावर कोणतीही कार्यवाही न करता वर्षभरानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने हा अहवाल पुढील कार्यवाहीकरिता विभागीय आयुक्तांकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन यातील दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) अशा आशयाची बातमी दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली असून त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांनी सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, जव्हार यांचे अध्यक्षतेखाली चार सदस्यीय चौकशी समिती गठीत केली, ही वस्तूस्थिती आहे.
(३) सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, जव्हार यांनी याप्रकरणी चौकशी करुन सविस्तर अहवाल जिल्हाधिकारी, पालघर यांना दि.०८/०२/२०२२ रोजी सादर केला आहे.
(४) व (५) सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, जव्हार यांनी जिल्हाधिकारी, पालघर यांना सादर केलेला चौकशी अहवाल स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह शासनास सादर केला असून सदर अहवालावर प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजा मानेवाडा (जि.नागपूर) येथील लेआउटमधील खुल्या जागेवर अनधिकृत भूखंडांचे नियमितीकरण केल्याबाबत**

**(७) * ३७५८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा मानेवाडा (जि.नागपूर) येथील ग्रीन प्लॅनेट कॉलनी, राघवेंद्र गृह निर्माण सहकारी संस्था येथे गुंठेवारी २.० अंतर्गत अस्तित्वात नसलेले ५ प्लॉट्स (३८-A, ४१-B, ४२-B, ५८-A, ७१-B) चे अनधिकृतरित्या नियमितीकरण करण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये विकासक व अधिकारी यांच्या संगनमताने खुल्या जागेवर ही गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ले-आउटमधील रहिवाशांनी हा भूखंड खेळाचे मैदान व उद्यानासाठी राखीव असावा म्हणून या नियमितीकरणावर हरकत घेतली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करुन सदरील नियमितीकरण रद्द करणेबाबत तसेच दोषी विकासक व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) नागपूर सुधार प्रन्यासद्वारे मौजा-मानेवाडा मधील राघवेंद्र गृह निर्माण सहकारी संस्था या अभिन्यासास दि.२७.०१.२००१ रोजी मंजूरी देण्यात आली. या अभिन्यासातील भुखंड क्र. ३८-अ, ४१-ब, ४२-ब, ७१-ब, ५८-अ हे भूखंड खुल्या जागेकरीता आरक्षित भूखंड दि.१२.०४.२००१ पासून श्री. विजय चिंचमलातपुरे व इतर भुखंडधारकांच्या ताब्यात आहेत. सदर भुखंडधारकांनी गुंठेवारी अधिनियम २००१ व गुंठेवारी अधिनियम २०२१ अंतर्गत या भूखंडांच्या नियमितीकरणाकरीता दि. २२.०२.२००१ व दि.१९.०८.२०१२ रोजी अर्ज केले. तथापि भुखंड क्र.३८-अ, ४१-ब, ४२-ब, ७१-ब, ५८-अ ही भुखंडके खुल्या जागेकरीता आरक्षित असल्याने त्यांचे नियमितीकरण नामंजूर करण्यात आले होते
या आदेशाविरुद्ध उपरोक्त भुखंडधारकांनी भुखंडाच्या नियमितीकरणाबाबत मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट पिटीशन नं ६५९३/२०२२ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दि. २२.१२.२०२२ रोजी सदर प्रकरणात आठ आठवडयात निर्णय घेण्याचे आदेश पारीत केले.
मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने नागपूर सुधार प्रन्यासद्वारे सुधारीत अभिन्यास नकाशात भुखंड क्र. ३८-अ, ४१-ब, ४२-ब, ७१-ब, ५८-अ या भुखंडकांचा समावेश करून सुधारीत अभिन्यास नकाशाला दि. ०७.०५.२०२४ रोजी मंजूरी देण्यात आली. तसेच त्यानुसार या भुखंडकांचे दि.१७.०५.२०२४ रोजी नियमितीकरण करण्यात आले आहे.
(३) हे खरे आहे
सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांच्या . १७.०५.२०२४ रोजीच्या आदेशाविरुद्ध चिंचमालातपूरे नागरीक कृती समिती यांनी मा. उच्च न्यायालयात रीट याचिका क. २३७/२०२३ दाखल केली आहे. सद्यस्थितीत सदर प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पांढरकवडा (जि.यवतमाळ) शहरातील अनेक ठिकाणी शासनाच्या वैशिष्टपूर्ण योजनेंतर्गत करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(८) * १३४२ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) शहरातील अनेक ठिकाणी शासनाच्या वैशिष्टपूर्ण योजनेंतर्गत गेल्या काही महिन्यात सिमेंट रस्ते, अंतर्गत नालीचे व सौंदर्यीकरणाची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची व अंदाजपत्रकानुसार झालेली नसून त्यात गैरव्यवहार झाला असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी संबंधित ठेकेदारांची देयके अदा करुन नयेत अशी मागणी स्थानिक नागरीकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
सदरची कामे करारनाम्याच्या तरतुदीप्रमाणे कार्यान्वित करण्यात येत आहेत.
(३) निवेदन प्राप्त नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेस शासनाच्या विविध विभागांकडून**
**थकबाकी येणे बाकी असल्याबाबत**

**(९) * १३२ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महापालिकेकडून राज्य शासनाच्या विविध विभागांना पाणीपुरवठया बरोबर विविध सुविधा पुरविण्यात येत असून प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या खर्चापोटी राज्य शासनाकडून महापालिकेला सहाय्यक अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षणाच्या खर्चासाठी सहाय्यक अनुदान, पाणीपट्टी आणि मालमत्ता कराचा राज्य शासनाच्या विविध खात्यांनी गेल्या वर्षभरात महापालिकेत भरणा न केल्यामुळे शासनाकडून महानगरपालिकेला जवळजवळ रुपये १६ हजार ७०० कोटी येणे बाकी असल्याचे दिनांक १० जानेवारी,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परिणामी निधीअभावी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सागरी किनारा मार्ग, गोरेगाव जोड रस्त्याच्या कामांसह अनेक पायाभूत प्रकल्पांची कामे प्रभावित होत असल्यामुळे महानगरपालिकेने शासनाकडे निधीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
डिसेंबर, २०२४ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या खर्चाकरिता सहाय्यक अनुदान याकरिता रु.६५८१.०८ कोटी, मालमत्ता कर व तत्सम आकार याकरिता रु.१५७६.९७ कोटी व मलनि:सारण आकार व जल आकारापोटी रु.७८०.१५ कोटी अशी एकूण रु.८९३८.२० कोटी इतकी रक्कम राज्य शासनाच्या विविध विभागांकडून येणे बाकी होती.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विक्रोळी (पूर्व) मौजे हरियाली, टागोर नगर या म्हाडा भू अभिन्यासातील न.भू.क्र २९५ येथील भूखंडावर अतिक्रमण केल्याबाबत

**(१०) * ३०८८ श्री.सुनील राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रोळी (पूर्व) मौजे हरियाली, टागोर नगर या म्हाडा भू-अभिन्यासातील इमारत क्र.५४ व ४१२ मधील न.भू.क्र २९५ मधील म्हाडा भूखंडावर श्री निल्सल सालियन, जॉय सालियन, निल सालीयन, मरीन शैला सालियन यांनी अतिक्रमण करुन "कोस्टल तवा" च्या नावाने बार व रेस्टॉरंटचा व्यवसाय सुरु केला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बार रेस्टॉरंटसाठी म्हाडाने परवानगी दिली आहे काय,
(३) असल्यास, उक्त भूखंडावर अतिक्रमण करुन सुरु केलेला बार व रेस्टॉरंट तात्काळ निष्कासित करण्याबाबत लोकप्रतिनिधिनी उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा, वांद्रे (पूर्व), मुंबई यांच्याकडे दिनांक २४ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून अनधिकृत व अतिक्रमित बार व रेस्टॉरंट निष्कासित करुन अशा अतिक्रमणास जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.
(२) नाही. बार करिता राज्य उत्पादन शुल्क विभाग व उपहार गृह इ. करिता आरोग्य विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका या कार्यालयाकडुन परवानगी देण्यात आली आहे.
(३) व (४) होय, हे खरे आहे. त्यानुषंगाने सदर भुखंडावरील अनधिकृत बांधकाम व टेली कम्युनिकेशन टॉवर निष्कासनाविरोधात संबंधीतांनी एकूण पाच वेगवेगळे दावे दिवाणी न्यायालयात दाखल केले आहेत. शहर दिवाणी न्यायालयाने सदर प्रकरणी स्थगिती आदेश दिलेले आहेत. म्हाडाकडून मूळ बांधकामावरील अतिक्रमण निष्कासनावरील केलेल्या कार्यवाहीवर दाखल दावे त्वरेने निष्कासित करण्याकरीता मा. दिवाणी न्यायालयात नोटीस ऑफ मोशन्स सादर करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात मोबाइल टॉवर असलेल्या कंपन्यांकडे महापालिकेची मालमत्ता कराची थकबाकी असल्याबाबत

**(११) * २५५ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात मोबाइल टॉवर असलेल्या कंपन्यांकडे महानगरपालिकेची ३५०० कोटींची मालमत्ता कराची थकबाकी असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित मोबाइल टॉवर कंपन्यांकडून सदरील थकबाकीची रक्कम महापालिकेने सक्तीने वसूल करु नये यासाठी शासनाने माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान पुणे महानगरपालिकेला आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कर वसूल करण्यासंदर्भात महापालिकेला सदरील आदेश देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, निधीअभावी महापालिकेच्या विकासकामांवर परिणाम होत असल्याने सदरील कराची रक्कम तातडीने वसूल करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन शासनाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मोबाईल टॉवर्सवर दंडात्मक कारवाई करण्यापूर्वी प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान) यांची नगर विकास विभागामार्फत पुर्व परवानगी मिळाल्यानंतरच अंतिम मोबाईल टॉवर्सवर अंतिम कारवाई करावी असे दि.३१.०१.२०२४ च्या पत्रान्वये सर्व महानगरपालिका व नगरपरिषद / नगरपंचायती यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) मिळकत कर आकारणी व करवसुली बाबत मोबाईल कंपन्यांनी मा.उच्च न्यायालयात वेगवेगळे दावे दाखल केले आहेत व ते प्रलंबित आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे दापोली, तरघर, कोपर, सोनखार व उलवे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील वन विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या भूखंडामध्ये झालेला गैरव्यवहार

**(१२) * २१ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दापोली, तरघर, कोपर, सोनखार व उलवे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील ६५ वर्षांपूर्वी वन विभागाकडे हस्तांतरित झालेल्या आणि राखीव वन म्हणून घोषित झालेल्या बिवलकर कुटुंबाच्या १५७ एकर जमिनीच्या भूसंपादनापोटी सिडकोने तब्बल १ हजार कोटी रूपये किंमतीचा भूखंड मूळ मालक असलेल्या बिवलकर कुटुंबाला इरादित केल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपवनसंरक्षक, अलिबाग व परिक्षेत्र वनअधिकारी, उरण यांनी ही बाब सिडकोच्या वारंवार निदर्शनास आणून तसेच भूखंड वाटपाची माहिती पाठविण्याची मागणी करूनही सिडकोने ती अदयाप दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयात दावा प्रलंबित असताना सिडकोने हा भूखंड इरादित केल्याने यात हजारो कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहु गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांचेकडे दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये केली, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

श्री.बिवलकर यांच्या मौजे-दापोली, कोपर, तरघर, सोनखार व उलवे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील कलेक्टर अँड कोर्ट ऑफ वार्डस, रायगड (कुलाबा/अलिबाग) यांच्या ताब्यात असलेल्या सुमारे ६०-९५-२ हे.आर. या नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादित केलेल्या जमिनीच्या बदल्यात शासन निर्णय, दि.०६.०३.१९९० व दि.२८.१०.१९९४ मधील तरतुदीनुसार १२.५ टक्के योजनेंतर्गत सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र.१२८८६, दि.०५.०३.२०२४ च्या मान्यतेने माहे डिसेंबर २०२४ मध्ये सिडकोमार्फत भुखंड इरादित करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे दि.१५.१०.२०२४, वन परिक्षेत्र अधिकारी, उरण यांचे दि.३१.१०.२०२४ व उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे दि.०९.१२.२०२४ रोजीचे पत्रांच्या अनुषंगाने सविस्तर माहिती उप वनसंरक्षक, अलिबाग यांना दि.२९.०१.२०२५ रोजी सिडको महामंडळामार्फत पत्रानुसार कळविण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

श्री.बिवलकर यांच्या मालकीच्या अन्य मिळकतीपैकी मौजे उलवे, ता. पनवेल येथील सर्व्हे क्र.५१, क्षेत्र-१५७ एकर या जमिनीपोटी भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील तरतूदीनुसार नुकसान भरपाईची रक्कम मिळण्यासाठी मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र. ३३७८/१९८९, २३२६/२०१० व ७९६३/२०१० मध्ये मा.उच्च न्यायालयाने एकत्रितरित्या दि.१४.१०.२०१४ रोजी श्री.बिवलकर यांच्या लाभात निर्णय पारित केला आहे.

दरम्यान, सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र.१२८८६, दि.०५.०३.२०२४ अन्वये मौजे-दापोली, कोपर, तरघर, सोनखार व उलवे येथील सुमारे ६०-९५-२ हे.आर. या संपादित जमिनीपोटी पात्रता मंजुर करण्यात आली आहे. सदर जमिनीमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित याचिकेमधील मौजे उलवे सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. ५१/०, क्षेत्र-१५७ एकर या जमिनीचा समावेश नाही. तथापि, सदर दाव्यामध्ये प्रलंबित असलेली जमीन / क्षेत्र व पात्रता मंजुर केलेली जमिन / क्षेत्र या दोन्ही वेगवेगळया जमिनी आहेत.

मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या SLP (C) nos. २८१९-२८२१/२०१७, २८१६-२८१८/२०१७ व ३५४६-३५४८/२०१५ मधील मा.न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधिन राहून उक्त ठराव पारित करण्यात आला आहे.

(४) सदरचे पत्र या विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे महापालिका क्षेत्रातील अनेक इमारती अतिधोकादायक स्थितीत असल्याबाबत**

**(१३) * १६४ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिका क्षेत्रातील मुंब्रा,कळवा,वागळे इस्टेटसह ठाणे शहरातील सुमारे ४ हजार ४०७ इमारती अतिधोकादायक स्थितीत असल्याची माहिती महापालिका प्रशासनाने केलेल्या तपासणीनुसार दिनांक १४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, महापालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींमध्ये वास्तव्यास असलेल्या लाखों नागरीकांच्या सुरक्षिततेसंदर्भात शासनामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

सदरील ४,४०७ धोकादायक इमारतींपैकी ९६ इमारती अतिधोकादायक घोषित करण्यात आलेल्या आहेत.

(२) अंशत: खरे आहे, ठाणे महानगरपालिकेने केलेल्या सर्वेक्षणानुसार,

- सी-१ या प्रवर्गातील ९६ इमारतींपैकी
  - ५३ इमारती रिक्त करण्यात आल्या असून त्यापैकी १८ इमारती निष्कासित केलेल्या आहेत.
  - ०७ बांधकामे बैठ्या स्वरुपाची आहेत.
  - ०८ बांधकामाचा धोकादायक भाग काढण्यात आला आहे.
  - ०४ बांधकामाबाबत वेगवेगळे स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट प्राप्त झाल्याने अशा बांधकामांचे IIT,VJTI यांचेमार्फत स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे.
  - उर्वरित २४ बांधकामाबाबत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून भोगवटा रिक्त करून निष्कासित करणेची कारवाई प्रस्तावित आहे.
- एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली नुसार महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सुविधांचा अभाव

असलेल्या भागाचा तसेच धोकादायक व जुन्या इमारतींचा एकत्रित विकास करणेसाठी महानगरपालिकेने सन २०१८ पासून ४५ नागरी पुनरुत्थान आराखडे राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार शासन राजपत्रामध्ये ४५ आराखड्यांच्या हद्दी अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत.

(३) अंशत: खरे आहे, ठाणे महानगरपालिकेने केलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे:

- धोकादायक इमारतीतील रहिवाशी व इतर नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक बांधकामाच्या दर्शनी भागावर इशारा फलक लावण्यात येत असून याबाबत रहिवाश्यांना व नागरिकांना वर्तमानपत्राच्या माध्यमातून जाहीर आवाहन प्रसिद्ध केले आहे.
- काही बांधकामाबाबत दोन भिन्न वर्गवारीचे स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट प्राप्त झाले आहेत. अशा बांधकामांवर कारवाई करण्याबाबत संभ्रम निर्माण झाल्याने अशा बांधकामांचे वरिष्ठ तांत्रिक संस्थांकडून ( जसे IIT,VJTI) स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्ट प्राप्त करून घेण्यात येत आहे.
- सी-१ वर्गवारीतील बांधकामांचे ड्रेनेज,विद्युत व पाणी संयोजन खंडित करण्यात आले आहेत/येत आहेत.
- धोकादायक बांधकामांमधील भोगवटाधारकांचे आवश्यकतेप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात महानगरपालिकेच्या शाळांमध्ये पुनर्वसन करण्यात येत आहे.
- अतिधोकादायक बांधकाम निष्कासित करताना एक मजल्यापेक्षा जास्त मजल्यांच्या बांधकामांना प्राधान्य देण्यात येत आहे.
- धोकादायक बांधकाम दुर्घटनाग्रस्त होण्यापूर्वी रहिवाशी व नागरिकांनी सतर्क होणेसाठी अशा बांधकामामध्ये मिळणारे संकेत (उदा.तडे जाणे,प्लास्टर पडणे,माती पडणे व इतर) वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात आले असून भित्तीपत्रक बांधकामांच्या दर्शनी भागावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत.
- अतिधोकादायक बांधकामांचे पुनर्विकास करणेसंदर्भात जमीन मालक,इमारत मालक,भोगवटादार व प्रस्तावित विकासक यांच्यात एकमत होत नसल्यास संबंधित भोगवटादारांकडून बांधकामे रिक्त होत नाहीत.त्यासाठी उपायुक्त,परिमंडळ यांचेस्तरावर बैठका घेण्यात येत असून त्यास सकारात्मक प्रतिसाद आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोरीवली मुंबई येथील एक्सरगांव परिसरातील बोरभाट गृहनिर्माण संस्थेच्या पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१४) * ९० श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बोरीवली येथील एक्सरगांव परिसरातील बोरभाट सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या प्रकल्पास २० वर्षे होऊनही अद्याप २१३ पात्र झोपडीवासीयांचे श्रीनिवास डेव्हलपर्स या विकासकाने पुनर्वसन केले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विकासकाने २१३ झोपडीवासीयांचे पुनर्वसन न करता विक्री करिता असलेल्या इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) मिळाली नसतानाही सदनिका वाटप केल्याने प्राधिकरणाने विकासकाविरुद्ध बेकायदा बांधकाम व उल्लंघन केल्या प्रकरणी सन २०१६ मध्ये नोटीस बजावूनही गत ८ वर्षात कोणतीही कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने सदरहू विकासकाविरुद्ध पोलीसात गुन्हा दाखल करुन विकासकाचे नाव काळ्या यादीत टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन २१३ झोपडीवासीयांचे तात्काळ पुनर्वसन करण्याबाबत तसेच दोषी विकासक आणि यास जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सदर योजनेत उर्वरीत पात्र २१३ झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन न करता विकासक मे.श्रीनिवास डेव्हलपर्स यांनी विक्री घटक इमारत बांधून भोगवटा प्रमाणपत्र न घेता, विक्री सदनिका विक्री केल्याने सदर विकासकाविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम ५३(१) अंतर्गत नोटीस बजावण्यात आली असुन, दि.०६.०१.२०२५ रोजी सदर विकासकाविरुध्द झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत बोरीवली पोलीस ठाणे येथे प्रथम खबर (FIR) क्र.००३१/२०२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व सदर विकासक मे. श्रीनिवास डेव्हलपर्स यांचे नाव काळ्या यादीमध्ये दाखल करण्यात आलेले आहे.

(४) सदर योजनेतील उर्वरीत झोपडीधारकांचे पुनर्वसन न केल्याने महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व.पु) अधिनियम १९७१ मधील कलम १३(२) अंतर्गत सदर संस्थेच्या विनंतीनुसार जुन्या विकासकाची नियुक्ती दि. २२.०७.२०२४ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आली असुन, बोरपाडा सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत झोपडीधारकांच्या सर्वसाधारण सभेमध्ये व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सहकार संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या मतदान प्रक्रियेद्वारे निवडलेल्या नवीन विकासक मे, श्रीजी अर्थराईज एल.एल.पी यांची नियुक्ती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत दि.२४.१२.२०२४ रोजी करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कासेगाव (ता. वाळवा, जि.सांगली) येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ साठी भुसंपादन करण्यात आलेल्या प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१५) * ११३८ श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासेगाव (ता. वाळवा, जि.सांगली) येथील नागरीकांचे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील कागल-सातारा विभागाचे कि.मी. ५९२.२४० पासून ते कि.मी. ७२५.००० पर्यंतच्या सहा पदरीकरण रस्त्याकरीता गट नंबर २२४१ व ३४८९ मधील रस्त्याच्या पूर्वेकडील व पश्चिमेकडील जमिन भुसंपादन करताना मोठ्या प्रमाणात नागरीकांची घरे बाधित झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाधितांपैकी मांगवाडा व चांभार टेक वस्तीत मातंग, चांभार, बौद्ध व नंदीवाले समाजाची एकूण ५०० गरीब, भूमिहीन व शेतमजूर मागासवर्गीय कुटूंबे राहत असून त्यांच्या नावे घराव्यतिरिक्त अन्य कोणतीही जमीन नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुळ २२० कुटूंबानाच शासनाकडून ५०० चौ.मी. जागा मोफत उपलब्ध करुन देणार तसेच अतिरिक्त जागेसाठी शासनाच्या रेडीरेकनर दराप्रमाणे आकारणी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्वच प्रकल्पबाधित कुटुंबांचे सर्वेक्षण करुन घरासाठी ७५० चौ.मी. जागा मोफत देण्याची मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, सांगली व स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून करुन वारंवार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बाधितांचे संपूर्ण पुनर्वसन करुन सोयीसुविधा उपलब्ध करण्यासह नुकसान भरपाईची रक्कम त्वरीत अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.

कागल ते सातारा राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ च्या सहा पदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत आहे. सदर महामार्गासाठी आवश्यक भूसंपादनाची कार्यवाही उपविभागीय अधिकारी, वाळवा यांचे मार्फत प्रगतीत आहे. सदर प्रकल्पासाठी कासेगांव ता. वाळवा जि. सांगली येथील गट नं. २२४१, २८३६, ३४८९, व ३४९०

मधील कंपाऊंड वॉल, पत्राशेडसह, काही इमारती अशा एकूण ३० मिळकती बाधीत होत आहेत.
(२) महसूल विभागाच्या नोंदीनुसार एकूण बाधीत ३० कुटुंबापैकी १२ कुटुंबांचे नांवे कासेगांव ता. वाळवा या ठिकाणी शेतजमीन मिळकत आहे.
(३) उप विभागीय अधिकारी, वाळवा उप विभागाकडील माहितीनुसार सदर कुटूंबांना ५०० चौ.मी. जागा मोफत मिळण्याबाबत संयुक्तिक प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांच्याकडे वाळवा पंचायत समिती स्तरावरील शक्ती प्रदत्त समितीमार्फत सादर करण्यात आला आहे. तथापि, या प्रस्तावाचा राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाशी संपादनाशी कोणताही संबंध नाही.
(४) अशी बाब या कार्यालयाच्या निदर्शनास आलेली नाही.
(५) भूसंपादन प्रस्तावास अनुसरुन बाधित मिळकतदार यांना नुकसान भरपाईबाबत राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन कायदा १९५६ व भूसंपादन पुनर्वसन व पुनर्वसनास उचित भरपाई आणि पारदर्शकतेचा अधिकार विधेयक-२०१३ मधील तरतूदीनुसार पुढील आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे,
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तुळजापूर ते सोलापूर या राष्ट्रीय महामार्गाचे काम निष्कृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत

**(१६) * १३५४ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुळजापूर ते सोलापूर या राष्ट्रीय महामार्गाचे तसेच तळमवाडी सांगवी कटी व पुढील काही कि.मी. अंतरावरील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे माहे ऑगस्ट,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा रस्ता सुस्थितीत असताना देखील या रस्त्यावर कोटयवधी रुपये खर्च करुन केलेले डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून रस्त्याची जागोजागी दुरवस्था झाल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत तसेच यातील दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही,
तुळजापूर ते सोलापूर या राष्ट्रीय महामार्गाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत करण्यात आले आहे.
सोलापूर येडशी राष्ट्रीय महामार्ग क. २११ (नवीन रा.म.क्र. ५२) ९८.७१७ कि.मी. लांबीचा असून, सदर प्रकल्पाचे काम माहे ऑक्टोबर २०१९ रोजी पूर्ण झालेले आहे. तसेच सदर प्रकल्प हा बांधा, वापरा व हस्तांतरण करा या तत्त्वावर असल्याने रस्त्याचे देखभाल व दुरुस्तीचे काम पुढील २९ वर्षे उद्योजकामार्फत करावयाचे आहे. त्याप्रमाणे दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे काम चालू आहे.
सद्यस्थितीत वाहतूक सुरळीत सुरु असून कोणतेही निकृष्ट दर्जाचे काम महामार्गावर आढळलेले नाही.
(२) सदर प्रकल्प बांधा, वापरा व हस्तांतरण करा या तत्वावर असल्याने करारनाम्यानुसार रस्त्याचे देखभाल व दुरुस्तीचे काम पुढील २९ वर्षे करण्याची जबाबदारी उद्योजकाची आहे. त्याप्रमाणे दैनंदिन देखभाल दुरुस्तीचे काम चालू असून कोणतेही निकृष्ट दर्जाचे काम महामार्गावर आढळलेले नाही. या व्यतिरिक्त या रस्त्यावर अपघाताच्या प्रमाणात वाढ झाल्याची नोंद नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## खडकवासला आणि पवना (जि.पुणे) धरणांच्या जलाशयांच्या क्षेत्रात जलसंपदा विभागाच्या जमिनीवर झालेले अतिक्रमण

**(१७) * १५८२ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील खडकवासला आणि पवना या धरणांच्या जलाशयांच्या क्षेत्रात, जलसंपदा विभागाच्या सुमारे एक हजार एकर जमिनीवर अतिक्रमण करुन तेथील जागांवर पाचशेहून अधिक बंगले, लॉन तसेच रिसॉर्ट उभारण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे धरणांमधील पाणी साठविण्याची क्षमता कमी झाली असून, त्याचा फटका पुण्याच्या पाणीपुरवठ्याला बसत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी जलसंपदा मंत्री यांनी कार्यवाही करण्याचे घोषित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अतिक्रमण निष्कासित करणे तसेच यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) खडकवासला व पवना धरणाच्या जलाशयांच्या बुडीत क्षेत्रात जलसंपदा विभागाच्या हद्दीत कोणतीही बांधकामे झालेली नाहीत.

तसेच, जलाशयाच्या प्रतिबंधीत क्षेत्रात अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीतांना वेळोवेळी रितसर नोटीसा देऊन व पोलीस यंत्रणेची मदत घेऊन निष्कासीत करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

पवना व खडकवासला धरणाच्या पाण्याखालील क्षेत्रात अतिक्रमण झाले नसल्याने धरणांमधील पाणी साठवण क्षमतेवर परिणाम झालेला नाही. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील पाणी पुरवठ्यावर कोणताही परिणाम झालेला नाही.

(३) होय, हे खरे आहे.

मा.जलसंपदा मंत्री (गोदावरी व महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांनी दि.१७.०१.२०२५ रोजी झालेल्या कार्यशाळेत पुणे जिल्ह्यातील धरण व कालवे तसेच पुणे शहरातील संपादित केलेल्या जमीनीवर झालेली अतिक्रमणे काढण्याबाबत आवश्यक कार्यवाही महसूल व वन विभाग, गृह विभाग व महानगरपालिका यांच्या मदतीने करावी, असे निर्देश दिले आहेत.

(४) खडकवासला आणि पवना (जि.पुणे) या धरण जलाशयाच्या बाजूने असणाऱ्या अतिक्रमण धारकांना दि.३१.१२.२०२४ रोजी रितसर नोटीसा देण्यात आलेल्या असून काही अतिक्रमणे निष्कासित करण्यात आलेली आहेत. उर्वरीत अतिक्रमणे निष्कासित करण्याची कार्यवाही, जलसंपदा विभाग (स्थापत्य व यांत्रिकी विभाग), पुणे महानगरपालिका, महसूल व वन विभाग व गृह विभाग यांच्या सहकार्याने प्रगतीत असल्याने संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील मुख्य जिल्हा मार्गाच्या रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(१८) * २२२ श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर-मनोर रस्ता या राष्ट्रीय (१६०-अ) महामार्गावर पालघर ते मनोर, विक्रमगड तालुक्यातील भोपोली, केवफाटा,

बांगरचोळा तसेच जव्हार फाटा ते पाचमाड पर्यंत येणाऱ्या वाहनांची संख्या मोठी असल्याने या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्ते दुरुस्त करणाऱ्या ठेकेदाराची मुदत माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये पूर्ण झाली असल्याने नव्याने ठेका देण्याच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून देखील कार्यादेश देण्यातकरिता विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पालघर तालुक्यातील नागझरी नाका ते बऱ्हाणपूर, नागझरी नाका ते मासवण, वेळगाव ते मनोर, दुर्वेश ते सावरे एंबुर, गुंदले दोन बंगला ते चहाडे, चहाडे ते तांदुळवाडी, दहिसर फाटा ते दहिसर केळवा ते माकणे सरावली ते कांद्रेभुरे ते टेंभी खोडावे या मुख्य जिल्हा मार्गांच्या रस्ताच्या कामांमध्ये कोट्यवधी रुपये खर्च करूनही रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याने रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्तांच्या दुरुस्तीसाठी कार्यादेश देण्याबाबत कोणती कार्यवाही तसेच दोषी कंत्राटदार व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) सदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अवजड वाहतुकीमुळे रस्ता काही प्रमाणात क्षतिग्रस्त झाला आहे.

(२) सदर कामाकरिता निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून कंत्राटदारास दिनांक १२.०२.२०२५ रोजी LOA देण्यात आलेला आहे. आवश्यक बँक गॅरंटी कन्फरमेशन दिनांक २७.०२.२०२५ रोजी प्राप्त झाले असून लवकरच कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

(३) व (४) सदर कामाचे बाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, कोकण यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेने औषध पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांची रक्कम थकविल्याबाबत**

**(१९) * ७५१ श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील केईएम आणि महात्मा गांधी रुग्णालयात विविध अत्यावश्यक सेवा व आधुनिकीकरणाकरिता निधी मंजूर होऊन दोन ते तीन वर्षाचा कालावधी होऊनही अद्यापही काम पूर्ण झाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने औषध पुरवठा करणाऱ्या १५० कंत्राटदारांचे तब्बल १२० कोटी रुपये थकविल्याने कंत्राटदारांनी केईएम, शीव, नायर रुग्णालयासह तब्बल २७ रुग्णालयात औषध पुरवठा बंद केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, औषध पुरवठा बंद झाल्यामुळे उपचारार्थ येणाऱ्या गोरगरीब, सर्वसामान्य रुग्णांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असून रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णालयात विविध अत्यावश्यक सेवा व आधुनिकीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत तसेच रुग्णांलयात औषधांचा पुरवठा सुरळित सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या केईएम रुग्णालयास सन २०२२-२३, २०२३-२४ व चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ करिता उपकरणे व आस्थापना यांचे आधुनिकिकरणासाठी प्रत्येकी रु.१ कोटी ५१ लक्ष ७५ हजार ८१४ याप्रमाणे एकूण रु.४ कोटी ५५ लक्ष २७ हजार ४४२ एवढा निधी उपलब्ध झालेला आहे. सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षात निधीची पुरेशी तरतूद असल्याने सदर निधी खर्च झालेला नाही. तथापि, चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये आधुनिकिकरण उपकरणे व आस्थापना यामधून रु.१ कोटी ३१ लक्ष ७५ हजार इतक्या रकमेच्या कामांकरिता निविदा प्रकिया पार पाडण्यात आली आहे.

महात्मा गांधी स्मारक रुग्णालय, परळ हे त्रिसदस्यीय न्यासामार्फत चालविण्यात येत असून सदर त्रिसदस्यीय न्यासामध्ये शासन, राज्य कामगार विमा महामंडळ व मिल ओनर्स असोसिएशन यांचा सहभाग आहे. सदर रुग्णालयाचा संपुर्ण खर्च राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्यामार्फत करण्यात येतो.

(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून औषध पुरवठादार यांना दि १४.०२.२०२५ पर्यंत साधारण २० कोटी रुपयाचे अधिदान करण्यात आले असुन उर्वरित साधारण १ कोटी रुपयाचे अधिदान करण्याची कार्यवाही सुरु आहे. सद्यस्थितीत सदर पुरवठादारांकडून औषध पुरवठा सुरळीतपणे सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे जुचंद्र (ता.वसई, जि.पालघर) येथील सागरी नियंत्रण क्षेत्रातील (सीआरझेड) बाधित पानथळ जागेवर तिवरांच्या झाडांची तोड होत असल्याबाबत

**(२०) * १४९७ श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जुचंद्र (ता.वसई, जि.पालघर) येथील सागरी नियंत्रण क्षेत्रातील (सीआरझेड) बाधित पानथळ जागेवर भुमापन क्र.२८३ व इतर ठिकाणी तिवरांच्या झाडांची मोठया प्रमाणावर कत्तल व मातीचा भराव टाकून बेकायदेशीर चाळी बांधण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी सीआरझेड व पर्यावरण नियमाचे उल्लंघन झाल्याच्या तक्रारी वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे होवूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून या प्रकरणी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्या व संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे.

उप विभागीय अधिकारी तथा अध्यक्ष, तालुका कांदळवन संरक्षण व संवर्धन संनियंत्रण समिती, वसई यांचेकडे नायगाव जुचंद्र, ता.वसई येथील सर्वे नं. २८३/१ व २ या संदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तक्रार अर्जावर कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

वसई विरार शहर महानगरपालिकेकडे सी.आर.झेड. व पर्यावरणाचे उल्लंघन झाल्याची तक्रार प्राप्त झालेली आहे. त्यानुसार मौजे जुचंद्र सर्वे नं.२८३ जमिनीवरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याच्या कार्यवाहीनुसार, दि.१८.०२.२०२५ पर्यत एकूण २२,१०० चौ. फुट बांधकाम निष्कासित करण्यात आले आहेत.

तथापि, सद्यस्थितीत सदर ठिकाणी ०८ रुम मध्ये रहिवास वापर असल्याने रुम धारकांना रुम खाली करण्याकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत नोटीस बजावण्यात आलेली असून पुढील नियमोचित कार्यवाही सुरू आहे.

(३) कांदळवन क्षेत्र बाधित प्रकरणी आवश्यक कार्यवाही व गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया उप विभागीय अधिकारी तथा अध्यक्ष, तालुका कांदळवन संरक्षण व संवर्धन संनियंत्रण समिती, वसई यांचेमार्फत करण्यात येत असून सदर प्रकरणी नायगाव पोलीस स्टेशन येथे पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ नुसार दि.०६.०७.२०२३ रोजी गुन्हा रजि नं. १८६/२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेचा मालमत्ता कर विकासक, उद्योजक व इतर संस्थांनी थकविला असल्याबाबत**

**(२१) * १० श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेचा एकुण ५ हजार कोटी रुपयांचा मालमत्ता कर विकासक, उद्योजक आणि इतर व्यक्ती व संस्थांकडे थकित असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापैकी ८९९ कोटींचा कर पाच विविध वॉर्डमधील व्यावसायिक व विकासक तसेच २५० कोटींचा कर एलआयसी तसेच डीबीएस रिएलिटी, कमला मिल आणि एएसआरडीसी यांनी देखील मोठ्या प्रमाणावर थकवला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मालमत्ता कराची थकबाकी वसुल करण्याबाबत तसेच या थकबाकीसाठी जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अशंत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने दि.०१.०४.२०१० पासून भांडवली मूल्याधारित करप्रणाली लागू केली त्याविरोधात प्रॉपर्टी ओनर्स असोसिएशन व इतर यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र. २५९२/२०१३ दाखल केली. मा.उच्च न्यायालयाने याबाबत दि.२४.०२.२०१४ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार करयोग्य मूल्याच्या १००% तसेच करयोग्य मूल्य व भांडवली मूल्याच्या फरकाच्या ५०% या सुत्रानुसार मालमत्ता कर भरणा करणेबाबत आदेश दिले. यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रातील कर भरणा करण्यात येत आहे. यानुसार विकासक, उद्योजक आणि इतर व्यक्ती व संस्थांकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेची मालमत्ता कराची एकूण ५४७०.५२ कोटी कर थकबाकी आहे.
(२) हे अशंत: खरे आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या अंतरिम निर्णयानुसार देय असलेल्या मालमत्ता कराच्या रकमेपैकी पाच विविध वार्ड मधील व्यावसायिक व विकासक यांची एकूण रु.१८७७.८४ कोटी इतकी मालमत्ता कराची रक्कम थकित आहे. तसेच, डीबीएस रिएलिटी कडे रु.६०.६४ कोटी, एमएसआरडीसी कडे रु.९३.७५ कोटी इतका मालमत्ताकर थकित आहे. तसेच, एलआयसीने रु.२३.५१ कोटी व कमला मिलने रु.६३.३३ कोटी इतक्या रकमेचे अधिकचा कर भरणा केला आहे.
(३) मा.न्यायालयाच्या आदेशानुसार कर भरणा न करणाऱ्या थकबाकीदारांवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २०२ नुसार थकित मालमत्ता कराच्या देय दिनांकापासून २ टक्के प्रतिमाह या दराने दंड आकारणी करण्यात आली आहे. कलम २०३ ते २०५ च्या तरतूदीनुसार एकूण ३९१८ मालमत्तांवर जप्ती व अटकावणीची कारवाई करण्याकरिता नोटीशी बजावण्यात आल्या आहेत. कलम २०६ नुसार ७५ अचल मालमत्तांच्या जाहीर लिलावाची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई गोवा महामार्गाच्या प्रलंबित कामाबाबत**

**(२२) * ३७० श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्ग हा कोकणात जाण्यासाठी अत्यंत महत्वाचा महामार्ग असून गत १३ वर्षापासून या महामार्गाचे काम प्रलंबित असल्याने मोठ्या प्रमाणात या महामार्गावर वाहतुक करणे गैरसोयीचे झाले असून अपघातांचे प्रमाण देखील वाढलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच या महामार्ग चौपदरीकरणातील महत्वाचा टप्पा असलेल्या कशेडी बोगद्यातून सध्या एकेरी वाहतूक सुरू असून अपुऱ्या व वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे वाहतूकीला अडचणी येत असल्याचेही निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महामार्गाच्या कामासाठी आतापर्यंत जवळजवळ १५ हजार ६०० कोटी खर्च झालेला असतानाही या महामार्गाचे काम अपूर्ण असून त्यावरील वाहतूक सुरळीत होवू शकली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई-गोवा महामार्गाचे काम तात्काळ पुर्ण करुन कशेडी बोगद्यातून दुहेरी वाहतूक सुरु करुन वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशत: खरे आहे,

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.३६६ वरील कि.मी.०/०० ते ८४/६०० या लांबीतील काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे मार्फत प्रगतीत असून, त्यापुढील कि.मी. ८४/६०० ते ४५०/१७० या लांबीतील काम राष्ट्रीय महामार्ग (सार्वजनिक बांधकाम) विभागामार्फत प्रगतीत आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे मार्फत प्रगतीत असलेल्या एकूण ८४.६० कि.मी. लांबीपैकी ७४.८० कि.मी. लांबीचे कॉक्रिटीकरणाचे काम पूर्ण झालेले असून उर्वरित पनवेल ते कासू ४२.३० कि.मी. लांबीतील मोठे पूल / उड्डाणपूलाचे काम मार्च-२०२५ पर्यत व कासू ते इंदापूर ४२.३० कि.मी. लांबीतील मोठे पूल / उड्डाणपूलाचे काम डिसेंबर-२०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

राष्ट्रीय महामार्ग विभाग (सार्वजनिक बांधकाम) यांचे मार्फत प्रगतीत असलेल्या एकूण ३५५.२८ कि.मी. लांबीपैकी ३१९.९० कि.मी. लांबीतील काम पूर्ण झालेले असून उर्वरित ३५.३५ कि.मी. लांबीतील काम प्रगतीत आहे. सदर लांबीतील मोठे पूल / उड्डाणपूल वगळता उर्वरित काम मे-२०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. चौपदरीकरणाचे काम पूर्ण झालेल्या ठिकाणी या महामार्गावरील अपघाताचे प्रमाण कमी झाल्याचे आढळून आले आहे.

(२) अंशत: खरे आहे,

कशेडी घाटामध्ये चौपदरीकरणाच्या कामामध्ये दोन बोगदयांची कामे मंजूर असून सद्यस्थितीत त्यापैकी एका बोगदयाचे काम पूर्ण झाले असून सदर बोगदयातून दुहेरी वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे. उर्वरित दुसऱ्या बोगदयाचे काम अंतिम टप्प्यात असून सदर बोगदयाचे काम मार्च-२०२५ अखेर पूर्ण करुन वाहतूकीसाठी खुला करण्याचे नियोजन आहे.

सद्यस्थितीत कशेडी घाटातील बोगदयासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामार्फत तात्पुरत्या स्वरुपात वीजपुरवठा उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या व्यतिरिक्त ठेकेदारामार्फत डिझेल जनरेटरची व्यवस्था करण्यात आली आहे. बोगदयातील कायमस्वरुपी व अखंडित वीजपुरवठयासाठी ११ K.V. वीजपुरवठयाची आवश्यकता असून त्याबाबत आवश्यक कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) हे अशंत: खरे आहे.

सदर महामार्गाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत असलेल्या कामांवर आजतागायत एकूण रु.३८७.८५ कोटी रुपये खर्च झाला असून सद्यस्थितीत एकूण ८४.६० कि.मी. लांबीपैकी ७४.८० कि.मी. लांबीचे कॉक्रटीकरणाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित संपूर्ण काम डिसेंबर-२०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

तसेच या महामार्गावरील राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.) विभागामार्फत प्रगतीत असलेल्या कामांवर आजतागायत एकूण रुपये ४५०० कोटी खर्च झाला असून सद्यस्थितीत एकूण ३५५.२८ कि.मी. लांबीपैकी ३१९.९० कि.मी. लांबीतील काम पूर्ण झालेले असून उर्वरित काम प्रगतीत असून मोठे पूल / उड्डाणपूल वगळता अन्य कामे मे-२०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) व (५) कशेडी बोगदयातील कायमस्वरुपी व सुरळीत वीज पुरवठयासाठी ११ K.V. वीजेची आवश्यकता असून वीजपुरवठा उपलब्ध करण्याबाबत कार्यवाही प्रगतीत असून मार्च-२०२५ अखेर कशेडी घाटातील दोन्ही बोगदयातून वाहतूक सुरु करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेने वर्सोवा-भाईदर किनारपट्टी मार्गासाठी आवश्यक परवानगी न घेता ठेकेदारांना सदरची कंत्राटे दिल्याबाबत

**(२३) * २७ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर पालिका प्रशासनाने दक्षिण मुंबईतील नरिमन पॉईन्ट-दहिसर-भाईंदर दरम्यानच्या सागरी किनारा मार्ग टप्पा क्र.३ अतर्गंत वर्सोवा-भाईंदर दरम्यानच्या २३.४८ कि.मी.चे २२ हजार १३६ कोटी रुपयाचे काम भूसंपादन प्रक्रिया न करता, सीआरझेडसह सर्व आवश्यक त्या परवानग्या न घेता बेकायदेशीररित्या चार कंत्राटदारांना ही कंत्राटे मंजुर करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालिकेच्या अधिकाऱ्यांनी या कंपन्यांना २२ हजार १६६ कोटींच्या कामाचे कार्यादेश तसेच सुसज्जता (मोबिलायझेशन) अग्रीमही देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहु प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी, कंत्राटदार व कंपनी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबईमध्ये किनारी रस्ता विकसित करण्याकरिता नियुक्त केलेल्या संयुक्त तांत्रिक समितीच्या शिफारशीनुसार वर्सोवा ते दहिसर व पुढे दहिसर ते भाईंदर दरम्यान रु.२२ हजार १६६ कोटी इतक्या किंमतीचा प्रकल्प सात पॅकेजेस मध्ये विभागलेला (Design and Build) या तत्वावर प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे हाती घेण्यात आला. या प्रकल्पाकरिता ४ कंत्राटदारांना निविदेची विहित प्रक्रिया पार पाडून टप्पानिहाय कामांकरिता कार्यादेश देण्यात आले आहे.

निविदेतील तरतूदीनुसार या संपुर्ण प्रकल्पासाठी आवश्यक परवानग्या/ना-हरकत प्राप्त करण्याची एकत्रित जबाबदारी पॅकेज A चे काम देण्यात आलेले कंत्राटदार मे.ॲपको इन्फ्राटेक प्रा. लि. यांना देण्यात आली आहे. यांनी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड व पर्यावरण वन मंत्रालय व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून परवानगी प्राप्त करुन घेण्यात आली आहे. तसेच, वन संवर्धन अधिनियम, १९८० अंतर्गत वन वळतीकरणाच्या प्रस्तावास (forest diversion proposal) मान्यता मिळाली असून वन हक्क अधिनियम अंतर्गत पर्यायी वनीकरणाबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

दर प्रकल्प मार्गरेषेने बाधित होणारी बहुतांश जमिन ही खाडी, कांदळवने व इतर नैसर्गिक क्षेत्रांमधून जाते. हे क्षेत्र प्रकल्पाच्या एकूण बाधित जमिनीपैकी अंदाजे ७०% असून शासकिय मालकीचे असल्याने भुसंपादन करण्याची

आवश्यकता नाही. उर्वरित अंदाजित ३०% जागा ही बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच खाजगी मालकीची असून, खाजगी जागेच्या भुसंपादनाची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रगतिपथावर आहे.

(२) हे खरे आहे.

या प्रकल्पाकरिता विहित निविदा कार्यपध्दतीचा अवलंब करुन कंत्राटदारांना टप्पानिहाय कामांकरिता कार्यादेश देण्यात आले आहेत. निविदेच्या तरतुदीनुसार कंत्राटदारांना प्रकल्प किमतीच्या १० टक्के इतकी रक्कम दोन हप्त्यांमध्ये ६ टक्के व्याजदराने अनुज्ञेय आहे. याकरिता कंत्राटदाराने मागणी केलेल्या रकमेच्या ११० टक्के रकमे इतके बँक हमीपत्र महानगरपालिकेस देणे आवश्यक आहे.

यानुसार कंत्राटदारांनी केलेल्या मागणीनुसार मे.ऍपको इन्फ्राटेक प्रा. लि. यांना पॅकेज-A & F करिता व मे.लार्सन अँड टुब्रो लिमिटेड यांना पॅकेज-E व पॅकेज-DBLR करिता प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात आगाऊ रक्कमेचे (Mobilization Advance) अधिदान करण्यात आलेले आहे. याव्यतिरिक्त सदर प्रकल्पामधील इतर कोणत्याही कंत्राटदारांनी आगाऊ रक्कमेची मागणी केलेली नाही. या कंत्राटदारांना दिलेल्या आगाऊ रक्कमेची व्याजासहित वसूली या कामापोटी देण्यात येणाऱ्या धावत्या देयकामधुन (Running Account Bills) करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती शहरात अनधिकृत मोबाईल टॉवर उभारल्याबाबत

**(२४) * २०६ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात एका मोबाईल टॉवरच्या परवानगीवर मोबईल कंपन्यांनी परस्पर अनेक अनधिकृत टॉवर उभारले असून शहरात २१७ अनधिकृत मोबाईल टॉवर असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, यासंदर्भात आयुक्तांनी आढावा घेऊन अनधिकृत मोबाईल टॉवर संदर्भात सहायक आयुक्तांना कार्यवाही अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत मोबाईल टॉवरमुळे महापालिकेचे कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत मोबाईल टॉवर काढण्यासंदर्भात तसेच सदर मोबाईल कंपन्या व त्यांना मदत करणाऱ्या पालिकेच्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे,

अमरावती शहरात एकूण ३८३ मोबाईल टॉवर अस्तित्वात असून त्यापैकी ८३ मोबाईल टॉवर्सला परवानगी देण्यात आलेली आहे. उर्वरित ३०० टॉवर्सकरिता परवानगी देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे आहे,

आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांनी दि.१०.०२.२०२५ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये सहायक आयुक्तांना अनधिकृत मोबाईल टॉवर्सवर कार्यवाही करणेबाबत सुचित केले.

(३) हे खरे आहे,

अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ३८३ पैकी ८३ मोबाईल टॉवरला परवानगी देण्यात आली असून त्यामधून महानगरपालिकेला एकूण रु.१.६५ कोटी इतके शुल्क प्राप्त झाले आहे. माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दि.१२.११.२०२४ च्या पत्रानुसार दि.०१.०१.२०२५ पासून मोबाईल टॉवरच्या परवानगीसाठी केंद्र शासनाच्या गतीशक्ती

पोर्टलचा वापर करून महानगरपालिकेद्वारे मोबाईल टॉवर्सला परवानगी देण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर महानगरपालिकेला अंदाजित रक्कम रु.५.१० कोटी शुल्क प्राप्त होणे अपेक्षित आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील परशुराम घाटातील काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२५) * १८८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील परशुराम घाटात सतत कोसळणाऱ्या दरडी, वाहून गेलेला संरक्षक भराव त्यामुळे ठिकठिकाणी रस्ता खचला असून मोठ्या प्रमाणात अपघातांचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घाटात सन २०२१ ते माहे डिसेंबर २०२४ या काळात मुख्य रस्त्यासह संरक्षक भिंती, भराव व रस्ते दुरुस्ती इत्यादी कामे ठोस उपाययोजना न करता तात्पुरत्या स्वरुपात केल्यामुळे तसेच कामांचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्यामुळे मोठ्या प्रमाणात निधी खर्च करुनही सदर कामे पुन्हा पुन्हा करावी लागतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कामांमध्ये कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर घाट रस्त्यांवर अपघातातील अनेक मृत व जखमींना अद्यापही भरपाई देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या रस्त्यांसाठी एकूण प्राप्त निधी, त्यामधून झालेला खर्च, कामाची गुणवत्ता इ.सर्व बाबींचे लेखापरिक्षण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन सदर घाट रस्त्यांची दुरुस्ती, मृत व जखमींना भरपाई देण्याबाबत तसेच दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) अंशत: खरे आहे,

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ मधील इंदापूर (कि.मी.८४/६००) ते झाराप (कि.मी.४५०/१७०) ही लांबी राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.) विभागाचे अखत्यारित आहे. दिनांक २१.६.२०२४ व दिनांक १६.१०.२०२४ रोजी परशुराम घाटात होत असलेल्या सततच्या पावसामुळे व भूस्खलनामुळे सुमारे ७० मी. लांबीतील संरक्षक भिंत कोसळली आहे. सदर संरक्षक भिंत वाहून गेल्यामुळे महामार्गाच्या मुख्य रस्त्याला सद्यस्थितीत कोणताही धोका झालेला नाही. तथापि, खबरदारीचा उपाय म्हणून राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत संरक्षक भिंत वाहून गेलेल्या ठिकाणी तातडीने मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवरील वाहतूक बंद करुन गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवरुन वळविण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत परशुराम घाटातील सुमारे २०० मी. लांबीमध्ये दोनपदरी (२-L) वाहतूक सुरु आहे. सदर भागामध्ये गंभीर अपघाताच्या घटना घडल्याचे आढळून आले नाही.
(२) हे खरे नाही,

परशुराम घाटातील चौपदरीकरणाचे HAM (Hybrid Annuity Model) तत्वावरील काम कल्याण टोलवेज यांना देण्यात आलेले आहे. HAM तत्वावरील कामांसाठी लागणारी संकल्पचित्रे, नकाशे संबंधित कंत्राटदारामार्फत तयार करुन त्यास मंजूरी केंद्रीय, रस्ते वाहतूक व परिवहन मंत्रालय यांच्यामार्फत नियुक्त स्वतंत्र अभियंत्यामार्फत देण्यात येते. तसेच करारनाम्यानुसार सदर कामाचे पर्यवेक्षण, तांत्रिक बाबी तपासणे इत्यादी कामेही स्वतंत्र अभियंत्यामार्फत करण्यात येतात.

प्रस्तुत कामासाठी मे.ब्लूम कंपनीची स्वतंत्र अभियंता (Independent Engineer) म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. HAM करारनाम्यानुसार प्रकल्प पूर्णत्वाच्या दिनांकापासून १५ वर्षापर्यंत दोष दायित्व कालावधी आहे. सद्यस्थितीत परशुराम घाटातील अतिवृष्टी व भूस्खनामुळे वाहून गेलेल्या संरक्षण भिंतीचे काम कंत्राटदारामार्फत नव्याने करण्यात येत आहे. नव्याने करण्यात येणाऱ्या कामासाठी कोणतेही अतिरिक्त देयक कंत्राटदारास अदा करण्यात येत नाही.
(३) हे खरे नाही,
(४) सदर प्रकल्प हे केंद्रीय रस्ते, वाहतूक व परिवहन मंत्रालय, नवी-दिल्ली यांच्या अखत्यारित असून मृत व जखमींना भरपाई देण्याबाबत केंद्रीय रस्ते, वाहतूक व परिवहन मंत्रालयाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रस्तुत टप्प्यातील कामावर आजतागायत एकूण रु.४७३ कोटी खर्च झालेला आहे. सदर कामावर देखरेख करणे, तांत्रिक बाबी तपासणे व देयक अदा करणे इ. कामे करण्यासाठी MORTH मार्फत मे.ब्लुम कंपनी यांची स्वतंत्र अभियंता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. स्वतंत्र अभियंत्यामार्फत कामाची गुणवत्ता राखण्याबाबत कार्यवाही करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.